

कथासरित्सागर
उज्ज्वला केळकर
परी प्रकाशन

**कथासरित्सागर**

◆ ——————

© सुरक्षित

◆ ——————

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆ ——————

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆ ——————

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

◆ ——————

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

◆ ——————

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

◆ ——————

**किंमत :**
रुपये ९०/-

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | महाकवी गुणाढ्य | ५ |
| २. | एका नगराची जन्मकथा | ९ |
| ३. | चाणाक्ष राजा प्रसेनजीत | १५ |
| ४. | मित्र असावा तर असा | १९ |
| ५. | असेल साथ दैवाची तर... | २३ |
| ६. | कोकरू शिकलं शहाणपण | २७ |
| ७. | चतुर उंदीर | ३१ |
| ८. | मुत्सद्दी चिरजीवी | ३५ |
| ९. | यमसोमाची कथा | ४० |
| १०. | लोभाचे फळ | ४३ |
| ११. | अर्थश्री आणि भोगश्री | ४६ |
| १२. | धूर्त झाला महामंत्री | ५१ |
| १३. | तपस्वी झाला राजा | ५४ |
| १४. | सोनेरी हंस | ६२ |
| १५. | राजकुमार आणि अस्वल | ६५ |
| १६. | परोपकारी जीमूतवाहन | ६९ |
| १७. | भद्रघट | ७७ |
| १८. | दैवाची लीला | ८० |
| १९. | सच्चा मित्र | ८४ |
| २०. | अग्नीदेवाचा प्रसाद | ८६ |
| २१. | परोपकारी इंदूप्रभ | ८९ |
| २२. | अवज्ञेचे फळ | ९२ |
| २३. | अहिंसेतील आनंद | ९६ |
| २४. | बलशाली भीमभट | ९९ |
| २५. | रुचिरदेव, पोतक आणि चंद्रसार | ११० |
| २६. | मुत्सद्दी महामंत्री | ११५ |
| २७. | कवडीचुंबक | ११९ |

# महाकवी गुणाढ्य

आपण पैठण ज्याला म्हणतो, ते गाव पूर्वी प्रतिष्ठान नगरी म्हणून प्रसिद्ध होते. मोठी समृद्ध आणि भरभराटीला आलेली अशी ही नगरी होती. या गावात सोमदत्त नावाचा ब्राह्मण राहायचा. त्याला वत्स, गुल्मक अशी दोन मुले होती तर मुलीचे नाव होते – श्रुतार्था. मुलांचे आई – वडील त्यांच्या लहानपणीच देवाघरी गेले. ही तीनही भावंडे एकमेकांना आधार देत, एकमेकांना मदत करत मोठी झाली. पुढे श्रुतार्थाचे लग्न कीर्तीसेन याच्याशी झाले. काही दिवसांनी तिला एक मुलगा झाला. बालक जन्मापासूनच तेजस्वी दिसत होते. मुलगा गुणी होवो या हेतूने त्याचे नाव गुणाढ्य असे ठेवले. काही दिवसांनी श्रुतार्था मरण पावली. त्यामुळे गुणाढ्याचे पालन–पोषण त्याच्या मामांनी केले. पुढे तेही कालवश झाले.

गुणाढ्याला विद्येची ओढ होती. विद्याभ्यासाठी तो दक्षिणेत गेला. तिथे अनेक वर्षे त्याने विद्याभ्यास केला. नाना विद्यात–शास्त्रात तो प्रवीण झाला. विद्वान पंडित म्हणून त्याची कीर्ती दूरवर पसरली. त्याला अनेक शिष्य मिळाले. आपल्या शिष्यांना घेऊन तो प्रतिष्ठान येथे आला. प्रतिष्ठान नगरीत त्यावेळी सातवाहन राजा राज्य करीत होता. गुणाढ्याची कीर्ती यापूर्वीच राजापर्यंत पोहोचली होती. राजाने त्याचा आदर–सत्कार केला व आपल्या दरबारात त्याला ठेवून घेतले.

पुढे वसंत ऋतू आला. राजा आपल्या परिवारासह जवळच्या उद्यानात गेला. या उद्यानात एक तळे होते. स्फटिकासारखे स्वच्छ निर्मळ पाणी पाहून सगळेच जलक्रीडेसाठी तळ्यात उतरले.

पाण्यात खूप वेळ डुंबून झाल्यानंतर राजा गमतीने राणीवर पाणी उडवू लागला. तशी राणी म्हणाली, 'मोदकै: परिताड्य माम।' राजाला काही त्याचा अर्थ कळला नाही. त्याला वाटले, राणी जलक्रीडा करून थकली असेल आणि खाण्यास मोदक मागत असेल. राजाने मोदकाची ताटे मागवली आणि आता तो तिच्याकडे मोदक टाकू लागला. सारेच आश्चर्याने पाहू लागले.

राणी म्हणाली, ''हे काय करताय महाराज ?'

राजा म्हणाला, 'तूच म्हणालीस, मोदकै परिताड्य माम्' म्हणजे माझ्यावर मोदकांचा मारा करा.''

राणी हसली आणि बघणारे सारेच हसले. राणी म्हणाली, ''महाराज, मी म्हटलं, 'मोदकै: परिताड्य माम्,' म्हणजे मा उदकै: परिताड्य माम् याचा अर्थ असा, माझ्यावर पाण्याचा मारा करू नका. मा उदकै:, याचा संधी होतो मोदकै:'' सारेच हसले. राजा खजिल झाला.

दुसऱ्या दिवशी गुणाढ्य आणि शिवशर्मा दोघे राजाला भेटायला गेले. शिवशर्मा हा दरबारातला दुसरा एक विद्वान पंडित. गुणाढ्य आल्यापासून त्याचे महत्त्व जरा कमी होत चालले होते, त्यामुळे त्याला गुणाढ्याबद्दल असूया वाटायची. राजाने गुणाढ्याला विचारले, ''व्याकरण शिकायला किती वर्षे लागतील?''

गुणाढ्य म्हणाला, ''महाराज, एरव्ही बारा वर्षे लागतात; पण मी आपल्याला सहा वर्षात शिकवेन.''

गुणाढ्याचं महत्त्व कमी करायची ही चांगलीच संधी आहे असं शिवशर्माला वाटलं. तो म्हणाला, ''महाराज, मी आपल्याला सहा महिन्यात व्याकरण शिकवेन.''

''शक्यच नाही.'' गुणाढ्य म्हणाला.

शेवटी यावर दोघांची पैज लागली. जो कुणी या पैजेत हरेल त्याने संस्कृत, प्राकृत व देशी भाषांचा त्याग करायचा असेही ठरले.

दोघेही आपापल्या घरी गेले. गुणाढ्यशी ईर्ष्येने आपण पैज लावली खरी; पण पैज जिंकणं अशक्य आहे हे शिवशर्माच्या लक्षात आलं. तो मनोमनी खंतावला. तो बोलेना की हलेना. जेवेना की झोपेना. आपला नवरा दु:खी –कष्टी आहे हे शिवशर्माच्या बायकोच्या लक्षात आलं. तिने कारण विचारलं. शिवशर्माने पैजेबद्दल सांगितलं. तशी ती म्हणाली, ''देवीच्या मंदिरात जा. तिथे तिची उपासना करा. तिची करुणा भाका. म्हणजे ती तुमच्यावर प्रसन्न होईल.''

शिवशर्मा देवीच्या मंदिरात गेला. तिची भक्ती केली. उपासना केली. तप केले. शिवशर्माच्या भक्तीने देवी प्रसन्न झाली. वर माग म्हणाली. शिवशर्मा म्हणाला, ''मला राजाला देण्यासाठी विद्या हवी.'' देवीने विद्येला त्याच्याबरोबर पाठवले. शिवशर्मा राजाकडे आला. त्याने राजाच्या उजव्या हातावर पाणी सोडले. देवीचे स्मरण केले व राजाला विद्या अर्पण केली. त्याबरोबर राजा विद्यापती झाला. आता तो शास्त्र, व्याकरण यात निपुण झाला. अद्याप सहा महिन्यांचा काळ व्हायचा होता. त्यामुळे गुणाढ्य पैज हरला. संस्कृत, प्राकृत (संस्कृतपासून जन्मलेल्या) आणि देशी अशा तीनही भाषांचा त्याने त्याग केला. आता पंडित असून, ज्ञान असून त्याला ते व्यक्त करता येत नव्हते. कारण भाषेचाच त्याने त्याग केला होता. त्याने मुक्यानेच राजाचा निरोप घेतला. राजाने त्याला 'जाऊ नको' म्हणून विनवले; पण तो तिथून निघून गेला.

गुणाढ्य तिथून विंध्याचल प्रदेशात आला. विंध्यवासिनीच्या मंदिरात त्याने आपला देह ठेवायचे ठरवले. आपल्याला बोलताच येत नाही तर जगून तरी काय उपयोग, असे त्याला वाटत होते; पण देवीने त्याला दर्शन दिले आणि त्याला काणभूतीची भेट घ्यायला सांगितले. पुढे त्याला लोकांचा एक समूह भेटला. ते कसल्या तरी वेगळ्याच भाषेत बोलत होते. ती भाषा त्याला माहीत नव्हती. त्याने गुणाढ्याला आपल्या नायकाकडे नेले. हा नायक म्हणजेच काणभूती. काणभूतीने त्याचे स्वागत केले. गुणाढ्य खूप दिवस त्यांच्याबरोबर राहिला. आता तो त्यांची भाषा शिकला. या साऱ्या जमातीला पिशाच्च म्हणत. त्यांची भाषा, ती पैशाची. या काळात काणभूतीने अनेक कथा सांगितल्या. सात विद्याधरांच्या या कथा त्याला पुष्पदंत नावाच्या शिवगणाने सांगितल्या होत्या. या कथा इतक्या अद्‌भुत आणि रसाळ होत्या, की पुढे अनेकांना वाचायला मिळाव्यात, म्हणून गुणाढ्याने त्या लिहून ठेवायचे ठरवले.

गुणाढ्याने सात विद्याधरांच्या कथा लिहायचे ठरवले खरे; पण अरण्यात लेखन साहित्य कुठून मिळणार ? त्याने मग पिशाच्चांकडून भूर्जपत्रे तयार करून घेतली. आपल्या शरीरातील रक्त काढून तो त्यावर रोज काही श्लोक लिहित असे. सात वर्षात त्याने सात लक्ष श्लोक रचून सात विद्याधरांच्या कथा लिहिल्या. हा प्रचंड ग्रंथ 'बृहत्कथा' म्हणून प्रसिद्ध आहे. ग्रंथ पूर्ण झाल्यावर त्याने तो काणभूत आणि इतर पिशाच्चांना वाचून दाखवला. त्यामुळे ते शापमुक्त झाले व यक्ष बनून स्वर्गात गेले.

गुणाढ्याचे शिष्य गुणदेव आणि नंददेव यांनी 'बृहत्कथा' हा ग्रंथ विद्वान राजा सातवाहन यास अर्पण करावा असे सुचवले आणि गुणाढ्याच्या परवानगीने ग्रंथ घेऊन प्रतिष्ठानला आले. तो प्रचंड

ग्रंथ पाहून राजा हबकलाच. त्याने ग्रंथाचा स्वीकार करायच्या ऐवजी त्याची अवहेलनाच केली. तो म्हणाला, ''हा ग्रंथ रक्ताने लिहिलेला आहे त्यामुळे तो अपवित्र आहे. त्याचप्रमाणे पैशाची ही सुसंस्कृतांची भाषा नाही. ती रानटी भाषा आहे. या ग्रंथाचा स्वीकार करता येणार नाही.''

शिष्य ग्रंथ घेऊन परतले. राजाचे उद्गार ऐकून गुणाढ्याला वाईट वाटले. तो ग्रंथ घेऊन प्रतिष्ठानजवळच्या डोंगरावर गेला. तिथे त्याने अग्नीकुंड पेटवले. सकाळी उठून स्नान वगैरे सर्व आन्हिक आवरून तो अग्नीकुंडाजवळ बसे व ग्रंथातील एकेक पान मोठ्याने वाचून अग्नीकुंडात टाकी. त्याचे हे रसाळ काव्य ऐकण्यासाठी रानातील पशू-पक्षी तिथे जमत. आपली तहान-भूक विसरून, परस्परातील वैर विसरून ते ती कथा ऐकत. अनेक लोकही ही कथा ऐकण्यासाठी तिथे जमत.

ही सारी हकीकत राजाला कळली. कुणी एक तेजस्वी ब्राह्मण म्हणे, आपल्या मधुर वाणीने, गंभीरपणे एकेक श्लोक वाचतो आणि वाचन झाले की ते पान अग्नीला अर्पण करतो. त्याचे रसाळ वाचन ऐकण्यासाठी माणसेच काय, पशू-पक्षीही जमा होतात. राजाला आश्चर्य वाटले. तो अरण्यात आला. नेहमीप्रमाणे गुणाढ्य एकेक पान वाचून अग्नीकुंडात टाकत होता. त्याची अद्भुत कथा आणि रसाळ वाणी ऐकल्यावर राजाला पश्चात्ताप झाला. त्याने गुणाढ्याची क्षमा मागितली आणि विचारले, ''हे काय चालले आहे?''

गुणाढ्याने पैशाची भाषेत सर्व सांगितले, ''सात वर्षे मी सात विद्याधरांच्या कथा सात लक्ष श्लोकात रचल्या. तू गुणी, विद्वान म्हणून तुझ्याकडे पाठवल्या; पण तू त्या स्वीकारल्या नाहीस. आता त्याचा काय उपयोग ? म्हणून मी त्यांचे शेवटचे वाचन करून त्या अग्नीकुंडात अर्पण करत आहे.'' राजाने त्या सातही विद्याधरांच्या कथा आपल्याला देण्याची विनंती केली; पण गुणाढ्य म्हणाला, ''सहा लक्ष श्लोकांची पाने अग्नीकुंडात भस्म झाली आहेत. एका विद्याधराच्या एक लक्ष श्लोकांच्या कथा शिल्लक आहेत. त्या मी तुला देतो. पैशाची भाषेतील माझ्या या कथा माझे शिष्य तुला समजावून देतील.'' गुणाढ्याने आपला उरलेला ग्रंथ राजाकडे सोपवला आणि तो वनात तप करण्यासाठी निघून गेला. राजा ग्रंथ घेऊन नगरीत परतला. त्याने शिष्यांना पुष्कळ द्रव्य दिले. पुढे गुणाढ्याच्या शिष्यांनी 'बृहत्कथेचा' भारतभर प्रसार केला. या अद्भुत कथा अतिशय लोकप्रिय झाल्या.

✦✦

# एका नगराची जन्मकथा

गंगा नदीच्या काठी हरिद्वारजवळ कनखल येथे एक ब्राह्मण तप करत होता. त्याला तीन मुले होती. आई–वडिलांच्या मृत्यूनंतर ही तीनही मुले विद्या संपादनासाठी राजगृह येथे गेली. राजगृह हे त्या काळात विद्यादानाच्या दृष्टीने सुप्रसिद्ध होतं. विद्या संपादन केल्यानंतर ती कार्तिकस्वामींच्या दर्शनासाठी दक्षिणेकडे गेली. येता येता ते चिंचिनी नावाच्या नगरात एका ब्राह्मणाकडे उतरले. त्या ब्राह्मणाला तीन मुली होत्या. त्याने आपल्या तीन मुलींची लग्ने या तीन भावांशी लावून दिली. नंतर तो तप करायला गंगेकाठी निघून गेला. तीनही भाऊ तिथेच त्याच्या घरी आपापल्या बायकांसह राहू लागले.

पुढे त्या भागात भयंकर दुष्काळ पडला. तसे ते तिघेही भाऊ आपापल्या बायकांना सोडून दूर देशी निघून गेले. त्यावेळी मधल्या भावाची बायको गरोदर होती. तिला कालांतराने मुलगा झाला. त्या तीनही बहिणींचे त्या छोट्या बालकावर खूप प्रेम होते. अतिशय काबाडकष्ट करून त्या या मुलाचं संगोपन करत होत्या. मुलगा अतिशय तेजस्वी दिसत होता. एकदा त्या तिघीजणी मुलाला घेऊन शंकराच्या मंदिरात गेल्या. तिथे त्यांना शंकराचा दृष्टांत झाला. शंकराने सांगितले, 'हा मुलगा पुत्रक या नावाने प्रसिद्ध होईल. तो झोपेतून उठला की त्याच्या उशाशी रोज काही

सुवर्णमुद्रा सापडतील. त्याचा उपयोग त्याला उत्तम विद्या देण्यासाठी आणि तुमच्या चरितार्थासाठी करा.'

बहिणी घरी आल्या. त्यांनी बालकाचे नाव पुत्रक असे ठेवले. दुसऱ्या दिवशी सकाळी पुत्रक उठला, तेव्हा त्यांना त्याच्या उशाशी काही सोन्याची नाणी सापडली. त्यांनी पुत्रकाला उत्तम शस्त्रास्त्र विद्या देईल असा गुरू शोधला. दिवस जात होते. पुत्रक आता अनेक विद्या आणि कला यात पारंगत झाला. तो चांगला तरुण आणि तगडा झाला. मग त्या राज्याच्या राजाच्या दरबारात कामाला लागला. एकदा राजा आपल्या सैनिकांचा लवाजमा घेऊन जंगलात शिकारीला गेला. एका वाघाचा पाठलाग करताना त्याची व सैनिकांची ताटातूट झाली. पुत्रक मात्र राजाच्या बरोबरीने आपला घोडा दौडवत होता.

होता होता वाघाने एकदम आपला पवित्रा बदलून राजाच्या अंगावर उडी घेतली. राजा बेसावध होता. तो एकदम घोड्यावरून खाली पडला. पुत्रकाने चपळाईने वाघाच्या जबड्यात तलवार सरकवली आणि नंतर भाल्याने वाघाला ठार मारले. राजाच्या जिवावरचे संकट टळले. दुसऱ्या दिवशी राजाने भर दरबारात पुत्रकाच्या सावधानतेचे आणि शौर्याचे कौतुक केले. राजाला मूलबाळ नव्हते. त्यामुळे त्याने पुत्रकाला दत्तक घेतले व कालांतराने आपल्या राज्याचा वारस म्हणून त्याला घोषित केले.

दरबारातील काही मंत्री आणि मुख्य म्हणजे प्रधान यांना ही गोष्ट मुळीच रुचली नाही. प्रधानाच्या मनात राजाने त्याच्या मुलाला दत्तक घ्यावे व राज्य द्यावे, असे होते. त्याने इतर काही मंत्र्यांच्या सहाय्याने पुत्रकाला मारायचा कट रचला. काही मारेकऱ्यांना विंध्यवासिनीच्या मंदिरात बसायला सांगितले आणि राजपुत्र पुत्रक येईल तेव्हा त्याला मारायला सांगितले. हे काम झाल्यावर त्यांना खूपसे द्रव्य द्यावयाचेही कबूल केले.

इकडे त्यांनी पुत्रकाला सांगितले, 'राज्याभिषेकाच्या सोहळ्याच्या दिवशी उगवत्या सूर्याच्या घटकेला त्याने एकट्यानेच देवीचे दर्शन घेतले तर तो त्याच्यासाठी मोठाच भाग्ययोग असेल. त्याप्रमाणे पुत्रक विंध्यवासिनी देवीच्या मंदिरात एकटाच गेला. तिथे त्याला मारण्यासाठी टपून बसलेले मारेकरी पुढे झाले. या काहीशा अनपेक्षित घटनेने पुत्रक गोंधळला. पुत्रकाने त्यांना मारण्याचे कारण विचारले, तसे त्यांनी प्रधान व अन्य मंत्री खूपसे